दि. 06/02/2023

१) सकाळ पू. पान क्र. १

## वसई-विरार, मिरा-भाईंदर शहरात गुन्ह्यांत दुपटीने वाढ

# सायबर गुन्हेगारांचा फास घट्ट

**प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा**

वसई, ता. ५ : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात चोरटेही आता हायटेक झाले आहेत. या हायटेक म्हणजेच सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय परिसरात वाढत असल्याचे पोलिसांनी दिलेल्या आकडेवारीवरून समोर आले आहे. २०२१ मध्ये ९९४ इतक्या सायबर गुन्ह्यांची नोंद झाली होती. यात गेल्या वर्षभरात जवळपास १७४४ म्हणजेच जवळपास दुपटीने वाढून दोन हजार ७३८ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यामुळे वसई-विरारसह मिरा-भाईंदर शहराला सायबर गुन्ह्यांचा विळखा पडला आहे.

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटसॲपसह मोबाईल क्रमांकावर सायबर गुन्हेगार विविध प्रकारचे संदेश पाठवून नागरिकांना फसवून त्यांच्या खात्यातून रक्कम लंपास करतात. यासाठी आता ओटीपीपेक्षा यूपीआय पिनचा वापर अधिक होत असल्याचे तपासातून समोर आले आहे. पोलिस आयुक्तालय क्षेत्रात असे प्रकार वाढू लागले असून नागरिकांनो सावधान राहा व त्वरित तक्रार नोंद करा, असे आवाहन सायबर गुन्हे कक्षाकडून करण्यात येत आहे.

पोलिस आयुक्तालय अंतर्गत सायबरविषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता गुन्हे शाखा अंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. ऑनलाईन फसवणुकीची तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांकडून त्वरित तपास करत सायबर भामट्यांच्या मुसक्या आवळल्या जातात. सायबर गुन्हे कक्ष येथे सामान्य नागरिकांची ऑनलाईन फसवणुकीची तक्रार प्राप्त होताच तात्काळ ज्या बँक खात्यात किंवा वॉलेटमध्ये रक्कम जमा झाली आहे, त्याचा शोध घेऊन सायबर गुन्हे कक्षाचे पोलिस अधिकारी, पोलिस अंमलदार या रकमेबाबत संबंधित बँकेशी संपर्क साधून ती रक्कम तक्रारदाराला परत मिळवून देत आहेत. पोलिस आयुक्तालयात पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्नील चाव्हळ, उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकर, हवालदार माधुरी धिंडे, प्रवीण आव्हाड, अंमलदार गणेश इलग, पल्लवी निकम, सुवर्णा माळी, अमिना पटाण आदींनी सायबर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी यश मिळवले आहे.


> सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती केली जात आहे. पोलिसांना अशा प्रकरणाचा तपास करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नागरिकांनी सावधपणे केला पाहिजे. यूपीआयचा पिन हा शेयर करू नका, तसेच अनोळखी व्यक्तीला आपली वैयक्तिक माहिती देणे टाळा.
> - **सुजितकुमार गुंजकर**, पोलिस निरीक्षक, सायबर गुन्हे कक्ष

### हनी ट्रॅपपासून सावधान

समाजमाध्यमांवरून होणारी ओळख अनेकदा महागात पडते. यात अनोळखी व्यक्ती व्हिडीओ कॉल करून आक्षेपार्ह गोष्टींचे चित्रिकरण केले जाते. त्यानंतर त्याच्या मदतीने ब्लॅकमेलिंग करून पैसे उकळण्याचा प्रयत्न होतो. आपली समाजात बदनामी होईल या भीतीने काही जण या जाळ्यात अडकतात, त्यामुळे अनोळखी मुलींशी समाजमाध्यमांवर काही क्षणाकरिता केलेली मैत्री पश्चातापाची वेळ आणू शकते. त्यामुळे अशा गोष्टींपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### जनजागृतीसाठी सेल्फी स्टँड

सायबर गुन्हे कक्षाकडून आयुक्तालयातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांना सायबर तपासाबाबत २२ ठिकाणी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सायबर गुन्हे फसवणुकीच्या प्रकारांबाबत माहिती देण्याकरीता १२ विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायबर गुन्हे कक्षाकडून सायबर तक्रारींमध्ये होणाऱ्या नागरिकांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी व सायबर फसवणुकीबाबत जनजागृती निर्माण होण्याकरीता स्वतंत्र सेल्फी स्टँडची उभारणी करण्यात आली आहे.




### फसवणूक झाल्यास काय कराल?

तात्काळ नजीकच्या पोलिस ठाणे, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी, असे आवाहन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाने नागरिकांना केले आहे.

**येथे करा तक्रार**

१ मोबाईल हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास https://www.ceir.gov.in/home/in/index.jsp

२ बँक/विमा कंपनी यांच्याविषयी तक्रार - https://sachet.rbi.org.in/

३ हरवलेले, गहाळ झालेले कागदपत्र, वस्तू तक्रारीसाठी- https://www.mbvv.mahapolice.gov.in/

४ फसवे एसएमएस, ई-मेल्स, कॉल - https://www.reportphishing.in/

### परदेशी ओळख महागात

समाजमाध्यमांवर अनेकदा परदेशी नागरिक म्हणून ओळख केली जाते, एकमेकांना मोबाईल क्रमांक दिला जातो. त्यानंतर भेटण्यास एअरपोर्टवर आलो, मात्र कस्टम किंवा अन्य बहाणा सांगून पैशांची गरज आहे असे सांगून पाठवण्याची विनंती करून लाखो रुपयांचा गंडा घातला जातो.

CamScanner
Scanned with CamScanner

२) म. टा. पू. पान क्र. १ दि. 06/02/2023

# सोनसाखळीचोऱ्या निम्म्यावर

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## गुन्हे उकल करण्याचे प्रमाणही घटले

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२१मध्ये सोनसाखळीचोरीच्या ११३ गुन्ह्यांची नोंद झाली होती. यातील ७५ म्हणजेच ६५ टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले होते. मागील वर्षभरात ४१ गुन्ह्यांची नोंद झाली असली तरी यातील केवळ २३ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. हे प्रमाण ५६ टक्के आहे. त्यामुळे दाखल गुन्ह्यांप्रमाणेच त्यांची उकल करण्याचे प्रमाणही घटले आहे.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मागील वर्षभरात सोनसाखळीचोरीच्या केवळ ४२ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. सन २०२१मध्ये अशाप्रकारच्या ११३ गुन्ह्यांची नोंद झाली होती. त्यामुळे मागील वर्षभरात सोनसाखळीचोऱ्यांच्या घटनांमध्ये निम्म्याहून अधिक घट झाल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी सोनसाखळीचोरी करणाऱ्या टोळ्यांना लक्ष्य केल्याने हा चांगला परिणाम दिसू लागला आहे. त्यामुळे नागरिकांमध्येही सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

सन २०२१मध्ये सोनसाखळीचोरांचा शोध घेण्यावर अधिक भर देण्याचे आदशे वरिष्ठ अधिकाऱ्यांना पोलिस आयुक्तांकडून देण्यात आले होते. या गुन्ह्यांचा गुन्हे शाखेकडूनही समांतर

### गेल्या वर्षी केवळ ४२ गुन्ह्यांची नोंद

तपास केला जात होता. सीसीटीव्ही कॅमेरे, चोरांच्या वाहनाचा क्रमांक व इतर माहितीच्या आधारे सोनसाखळीचोरांना पोलिसांकडून अटक करण्यात आली होती. त्यानंतर सोनसाखळीचोरीच्या घटनांमध्ये घट होऊ लागल्याचे बोलले जात आहे. सन २०२२मध्ये ४१ सोनसाखळी चोरीच्या घटनांची नोंद झाली असून हे प्रमाण २०२१च्या तुलनेत ६४ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षभरात वसई-विरार शहरात आचोळे व विरार पोलिस ठाण्याच्या हद्दीत सोनसाखळीचोरीचे सर्वाधिक गुन्हे घडले आहेत. त्यानंतर मिरा-भाईंदरमध्ये नवघर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अधिक गुन्ह्यांची नोंद आहे.

३) पुढारी पान क्र. ३

# वसईत आज केंद्र सरकारविरोधात काँग्रेसची निदर्शने

वसई : पुढारी वृत्तसेवा

अदानी उद्योग समूहामध्ये एलआयसी, स्टेट बँक ऑफ इंडिया व सार्वजनिक क्षेत्रातील वित्तीय संस्थांना कोट्यवधी रुपये गुंतवण्यास केंद्रातील मोदी सरकारने भाग पाडले आहे. एलआयसीचे २९ कोटी गुंतवणूकदार व स्टेट बँकेच्या ४९ कोटी खातेदारांचा कष्टाचा पैसा परत मिळेल का? अशी भीती निर्माण झाली आहे. केंद्रातील मोदी सरकारने निवडक उद्योगपतींवर मेहरबानी दाखवत सामान्य माणसाचा कष्टाचा पैसा धोक्यात टाकला आहे. असा आरोप करीत, काँग्रेसचे वसई विरार जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांनी उद्या, सोमवार दि. ६ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ११ वाजता एलआयसी कार्यालयासमोर नवघर, वसई (प) आणि दु. १२ वाजता वसई, पारनाका येथील भारतीय स्टेट बँकेसमोर निदर्शने करण्यात येणार असल्याचे सांगितले.

एलआयसी व स्टेट बँक ऑफ इंडिया आपल्या देशाचे गौरव आहेत. या वित्तीय संस्थांमध्ये सर्वसामान्य मध्यमवर्ग नोकरदार, छोटे व्यापारी यांनी आपल्या मेहनतीचा पैसा गुंतवला आहे. परंतु मोदी सरकारने अदानींच्या कंपन्यांमध्ये हा पैसा जबरदस्तीने गुंतवला आहे. अदानी समूहातील गैरकारभारामुळे एलआयसीचे ३९ कोटी पॉलिसीधारक व गुंतवणूकदारांचे ३३ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. तसेच भारतीय स्टेट बँक व इतर बँकांनी मिळून तब्बल ८० हजार कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. काँग्रेस पक्ष नेहमीच सामान्य जनतेच्या पाठीशी उभा राहिला आहे. अदानी उद्योग समूहातील गैरकारभारची चौकशी व्हावी यासाठी काँग्रेस पक्ष संसदेत आवाज उठवत आहे.

४) पुण्यनगरी पू. पान क्र. ४

# भाईंदरमध्ये पोलीस गोळीबारातील शहिदांना श्रद्धांजली

मीरा रोड । भाईंदरमधील संघर्ष सेवा समितीचे अध्यक्ष गौतम जैन यांनी यंदाही भाईंदर (पूर्व) बी. पी. रोड नाका येथील शहीद चौक स्मारक येथे १९८५ मध्ये पोलीस गोळीबारातील शहिदांना पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. यावेळी पादचाऱ्यांनीही स्मारकावर पुष्पहार अर्पण केले.

भाईंदरमध्ये ५ फेब्रुवारी १९८५ रोजी 'रेल रोको आंदोलन' करण्यात आले होते. यावेळी उपोषणासाठी बसलेले ७ आंदोलक पोलिसांच्या गोळीबारात शहीद झाले. भाईंदरच्या नागरिकांनी चर्चगेट ते भाईंदर लोकल ट्रेन चालवण्याची मागणी केली होती, मागणीसाठी नागरिकांनी राजधानी रेल्वे थांबवून आंदोलन सुरू केले, त्यात वसंत बाबुलाल शाह, दत्ताराम तात्या आबे, हितेश सी. पारीख, एल. के. शहा, रशीद मियाँ, मेघराज एन. जाधव, प्रणिलाल शहा असल्याचे सांगतात. त्यांच्या स्मरणार्थ शहीद चौक स्मारक बांधले होते. यावेळी पत्रकार पी. एल. चतुर्वेदी, ज्येष्ठ पत्रकार देवेंद्र पोरवाल, पत्रकार एस. एस. राजू, उपेंद्र सिंह, सुभाष पांडे, संजय जैन, लक्ष्मीचंद टाटिया, अझिज अहमद आदी उपस्थित होते.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 06/02/2023

5) लोकमत पु. पान क्र. 1

# मीरा-भाईंदरमधील निर्जन ठिकाणे गुन्हेगारांचे अड्डे

धीरज परब

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमधील निर्जन ठिकाणे गैरप्रकार व गुन्ह्यांचे अड्डे बनली आहेत. खून, बलात्कार, लूटमारसारख्या घटना घडल्या असून व्यसनी व अनैतिक प्रकारांना मोकळे रान बनले आहे.

शहराच्या अंतर्गत भागातसुद्धा अनेक निर्जन ठिकाणे आहेत. ही ठिकाणे गुन्हेगारांना सोयीची ठरली आहेत. भाईंदर पश्चिमेस रेल्वे स्थानकलगतचा काही परिसर अतिशय वर्दळीचा असला तरी त्यातील काही भाग निर्जन आहे. तेथे खून, अनैतिक व्यवसाय, लूटमारसारखे प्रकार घडले आहेत. गेल्या वर्षी पेणकरपाडा-सृष्टी दरम्यान निर्जन ठिकाणी हत्याकांड घडले होते. भाईंदर पूर्वेच्या नवघर मार्गावरील जैन नगरमागे पालिकेच्या पडीक मलनिस्सारण केंद्राच्या आवारात बलात्काराची घटना घडली होती. खून, बलात्कार, अनैतिक प्रकार, लूटमारसारख्या घटना निर्जन ठिकाणी होत आल्या आहेत. जुगारी, गर्दुल्ले, मद्यपी, व्यसनी आदींचे तर निर्जन ठिकाणे अड्डेच बनली आहेत. अगदी शहरातील रस्ते-पदपथचे कोपरे, इमारतींच्या भिंतींचे आडोसे, सार्वजनिक शौचालय परिसरदेखील ह्या गैरप्रकारांमधून सुटलेले नाहीत. पोलिसांना तक्रार केल्यास आपले नाव त्या गर्दुल्ले वा टपोरींना सांगितले तर? अशी धास्तीसुद्धा लोकांमध्ये असते. अनेक रहिवासी निडरपणे तक्रारी करतात व परिसरातील व्यथा मांडतात. त्यावर थोडीफार कारवाई होते. मात्र ती तात्पुरती असल्याने पुन्हा येरे माझ्या मागल्या सुरू असते. मुळात गांजा आदीसारखे अमली पदार्थ सहज मिळत असल्याने आश्चर्य व्यक्त होते.

## खाडी, समुद्रठिकाणी होते गर्दी

मीरा भाईंदर शहर हे खाडी, समुद्र आणि जंगल पट्ट्याने वेढले आहे. अशा पट्ट्यात बेकायदा भराव करून बांधकामे होत आहेत. त्यामुळे अशा निर्जन ठिकाणी जाण्याचे मार्ग सहज सुलभ झाले आहेत. त्यामुळे येथे गर्दी होत असते.

6) लोकमत पु. पान क्र. 3

# अनोळखीला मदत करणे वृद्धेला पडले महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : दोघा अनोळखी इसमांनी रेल्वे स्थानकापर्यंत जाण्यास पैसे नाहीत, असे सांगितल्याने त्यांच्या मदतीसाठी धावलेल्या वृद्धेलाच त्या दोघा भामट्यांनी ८० हजारांना फसवल्याची घटना भाईंदरमध्ये घडली.

भाईंदर पश्चिमेच्या पोद्दार शाळेसमोर शिवमहिमा इमारतीत राहणाऱ्या ७२ वर्षीय सरस्वती गुप्ता शुक्रवारी दुपारी मुलाला त्याच्या पानाच्या दुकानावर जेवणाचा डबा देऊन परत येत होत्या.

त्यावेळी दोघे अनोळखी इसम त्यांना भेटले व आम्ही बिहारी आहोत, आम्हाला कामावरून काढून टाकल्याने पैसे नाहीत. आम्हाला रेल्वे स्थानकापर्यंत रिक्षातून सोडा, अशी विनवणी केली.

दया आल्याने सरस्वती यांनी त्यांना रिक्षात बसवले व खान पीव्हीसी दुकानासमोर सोडले. खाली उतरल्यावर त्या दोघांनी सरस्वती यांना त्यांचे मंगळसूत्र व कानातले चोरीला जातील, असे सांगून घाबरवले. सरस्वती यांनी एका इसमाने दिलेल्या रुमालात सोन्याचे दागिने काढून ठेवले.

ते दोघे इसम निघून गेल्यानंतर त्या महिलेने रुमाल उघडून पहिला असता त्यांत दागिन्यांच्या ऐवजी दगड होते. ८० हजारांची फसवणूक केल्याचा गुन्हा भाईंदर पोलिसांनी दाखल करून तपास सुरू केला आहे.

CamScanner
Scanned with CamScanner

दि. 06/02/2023

7) लोकमत पान क्र. 12

# सोने स्वस्तात खरेदीची इच्छा पडली महागात

## ३० लाखांची फसवणूक : चौकडी अटकेत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : गुप्त धनातील सोने स्वस्तात देण्याच्या बहाण्याने आधी ज्येष्ठ नागरिकाचा विश्वास संपादन करून त्यानंतर त्याची फसवणूक करणाऱ्या चौकडीला विरारच्या भाटपाड्यातून अटक करण्यात आली आहे. या चौकडीत एका महिलेचा समावेश आहे.

मुंबईतील एका ज्येष्ठ नागरिकाला एक ग्रॅम सोने देऊन या सोन्याची पारख करण्यास ठग गँगच्या सदस्याने सांगत गुप्त धनातील सोने स्वस्तात देण्याचे आमिष दाखवले होते. या ज्येष्ठ नागरिकाने एक ग्रॅम सोने पारखून घेतले असता, ते खरे असल्याचे समजले. त्यामुळे ठग गँगचा सदस्य सांगत असलेली माहिती खरी असल्याचा त्यांना विश्वास बसला आणि खरे सोने घेण्यासाठी त्यांनी ३० लाख रुपये या गँगला दिले. त्यानंतर मात्र त्यांच्या हाती काहीच लागले नाही. त्यामुळे फसगत झाल्याचे कळल्यावर त्यांनी विरार पोलिस ठाणे गाठले.

पोलिसांनी तक्रार नोंदवून तपास केला असता, उत्तर प्रदेशातील ठग गँगने हा प्रकार केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर या गँगच्या चार जणांना विरारच्या भाटपाडा परिसरातून अटक करण्यात आली. आरोपी विजयकुमार राय, विनय परमार, मणिलाल परमार आणि जीविदेवी अशी अटक करण्यात आलेल्या ठगांची नावे आहेत. त्यांच्याकडून १० लाख रुपये रोख आणि पाच किलो बनावट सोने हस्तगत करण्यात आले आहे.

8) म. टा. पु. पान क्र. 1

# पालिकेतील भ्रष्टाचाराविरोधात आंदोलन



मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर पालिकेत मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू असल्याचे सांगत, त्याविरोधात भाजपचे पदाधिकारी भरत मिश्रा यांनी मनपा आयुक्त दालनाच्या बाहेर मूक आंदोलन केले. या संदर्भात लवकरच पुराव्यासह मोठा खुलासा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

मिरा-भाईंदर पालिकेतील वरिष्ठ अधिकारी बड्या कंत्राटांमध्ये कोट्यवधींचा आर्थिक भ्रष्टाचार करत आहेत. याविरोधात वृत्तसंस्थांसह सामान्य नागरिकांनी आवाज उठवल्यास त्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून केला जात असल्याचे मिश्रा यांनी म्हटले आहे. या विरोधात त्यांनी फलक दर्शवून पालिका मनपा आयुक्त यांच्या दालना बाहेर हे आंदोलन केले. ही भ्रष्ट कार्यपद्धती मनपा अधिकाऱ्यांनी येत्या आठवडाभरात बदलावी. अन्यथा भ्रष्टाचारा विरोधातील पुरावे नागरिकांसमोर आणणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.

9) पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# गुटखा विक्रेत्यावर गुन्हा

**मीरा रोड :** काशिमिरा येथील गौरव एक्सलेन्सी रस्त्यावर घनश्याम पान शॉपमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू, तंबाखूजन्य प्रतिबंधीत हुक्का फ्लेवर विक्रीस ठेवल्याचे असल्याचे आढळले, त्यामुळे अंमली पदार्थ विरोधी कक्षाने शॉपवर कारवाई केली. त्याच्याविरोधात काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हडकेश परिसरातील गौरव एक्सलेन्सी रस्त्यावर असलेल्या घनश्याम पान शॉपमध्ये गुटखा विक्री करत असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी कक्षाला मिळाली. त्यानुसार दुकानावर छापा टाकला असता, शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा, पानमसाला, सुगंधीत तंबाखू, तंबाखूमिश्रित प्रतिबंधीत हुक्का बेकायदा विक्रीस साठवून ठेवल्याचे निदर्शनास आले. मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पानटपरी चालकाविरोधात कलम २७२, २७३, ३२८, ३४ सह सिगारेट व इतर तंबाखू उत्पादनांचा व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि त्यांचे उत्पादन, पुरवठा व वितरण यावर निर्बंध अधिनियम २००३ चे कलम ७ सह अन्न सुरक्षा मानदे कायदा २००६ मधील कलम २६ (२) (१) शिक्षा कलम ५९, तसेच अन्नसुरक्षा कलम २७ (३) (ड)(ई) काशिमिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

CamScanner

Scanned with CamScanner

दि. 06/02/2023

10) पुण्यनगरी पृ. पान क्र.1

## गैरकृत्यामुळे दोघांना अटक

नालासोपारा : विरारमधील एकता पार्क मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करून घेणाऱ्या दोघांना अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी छापा टाकून अटक केली आहे. विरार पश्चिमेकडील ग्लोबल सिटी येथील स्पा सेंटरमध्ये वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक कक्ष, नालासोपारा यांना मिळाली. तेव्हा तेथील दोघेजण मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करत होते. दोघे जस्टडायलवरून ग्राहकांशी संपर्क साधत होते. स्पामध्ये बोलावून मसाजच्या नावाखाली काम करणाऱ्या मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त करत होते. खात्री करून घेण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक कक्ष, नालासोपारा पोलीस निरीक्षक संतोष चौधरी व पथक बोगस ग्राहक व पंचासह मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गेले. अनैतिक प्रकार पाहून कारवाई करून एक महिला आणि पुरुष यांना रोख रक्कम व इतर मुद्देमालासह ताब्यात घेतले. पीडित महिलेची सुटका करण्यात आली. याप्रकरणी अर्नाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

11) पुढारी पृ. पान क्र.1

## भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या पोलिसांना मारहाण

मिरा रोड : उत्तन पोलीस ठाणे हद्दीत पती पत्नीचे भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या पोलिसांना मारहाण केल्यामुळे सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी त्या इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उत्तन येथील डोंगरी कोस्टल चेक पोस्ट येथे वाहन चालक यांनी मिडटाऊन हॉटेल शेजारी रस्त्यावर एक इसम एका महिलेला मारहाण करत असताना पोलिसांनी मध्यस्ती करून त्यांचे भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला असता तो इसम पोलिसांना शिवीगाळ करु लागला. पोलिसांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, तरीही त्या इसमाने पोलिसांना मारहाण केली. त्यावेळी पोलीस हवालदार यांच्या हाताला जखम झाली. तो इसम दारुच्या नशेत होता. त्या इसमाचे नाव राजा कोकणसिंग ठाकुर असून ती महिला त्याची पत्नी आहे. ठाकूरविरुद्ध उत्तन सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

12) लोकसत्ता पान क्र.3

## अभिनेत्री उर्वशी ढोलकियाच्या वाहनाला अपघात

भाईंदर : काशिमीरा येथे झालेल्या एका अपघातातून अभिनेत्री उर्वशी ढोलकिया थोडक्यात बचावली. शनिवारी सकाळी एका शाळेच्या बसने तिच्या वाहनाला धडक दिली. काशिमीरा येथील एका स्टुडिओमध्ये चित्रीकरणासाठी जात असताना हा अपघात झाला. दहिसर पथकर नाक्याच्या काही अंतर पुढे पालिकेच्या नाट्यगृहासमोरून तिची गाडी जात असताना मागून येणाऱ्या शाळेच्या बसने धडक दिली. यावेळी दोन्ही वाहनचालकांनी वेळेत गाडीवर नियंत्रण मिळवल्यामुळे कोणतीही मोठी दुर्घटना झाली नाही.

CamScanner

Scanned with CamScanner

शिंदे-फडणवीस सरकार रोजाना करती है 20 लाख खर्च ...पेज-3

MHT मुंबई हिंदमाता टाइम्स
राष्ट्रीय हिन्दी दैनिक

ग्रैमी अवॉर्ड्स में भारत का डंका ...पेज-6

मुंबई, मंगलवार 7 फरवरी 2023

आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त 7.11am 6.35pm | आज का मौसम | तापमान अधिकतम 32°C न्यूनतम 22°C | शेयर बाजार NSE BSE | सर्राफा बाजार

# बाइक व साइकिल चोरी करने वाले गैंग का पर्दाफाश

## 12 साइकिल बरामद, 6 मामलों का हुआ खुलासा



### पहले भी मामले हैं दर्ज

भरतकुमार रगाराम पुरोहित (35) की नालासोपारा पूर्व के गाला नगर क्षेत्र से एक मोटरसाइकिल बिल्डिंग के सामने से चोरी हो गई थी। इस मामले में पुरोहित ने नजदीकी पुलिस स्टेशन में अज्ञात चोर के खिलाफ केस दर्ज करवाया था। जिसके बाद डिटेक्शन ब्रांच ने तकनीकी विश्लेषण के माध्यम से एवं सीसीटीवी फुटेज के आधार पर जाल बिछा कर दो संदिग्ध को हिरासत में ले लिया। उसने अपना नाम सलाउद्दीन सलिम खान, व्यवसाय भंगार विक्री व बिपीन दिलीप राय, व्यवसाय रिक्शाचालक बताया, जिसके बाद दोनों को पुलिस स्टेशन लाया गया और उससे आगे की पूछताछ में खुलासा हुआ कि आरोपी बिपीन दिलीप राय पर आचोले पुलिस स्टेशन में मामला दर्ज है।

**वसई।** आचोले पुलिस ने बाइक व साइकिल चोरी करने वाले गैंग का पर्दाफाश किया है। बाइक चोरी के आरोप में सलाउद्दीन सलीम खान, बिपिन दिलीप राय, जिशान अहमद, इबरार खान, अविनाश वाल्मीकि को गिरफ्तार किया है। इनके पास से दो बाइक व चार स्क्रैप की गई बाइक बरामद की गई है।

गिरफ्तार आरोपी बाइक चुराकर भंगार वालों को बेच देते थे। गिरफ्तार आरोपियों पर कई मामले दर्ज हैं। इसी तरह पुलिस ने साइकिल चोरी करने वाले भरत वाघरी को गिरफ्तार कर उसके पास से 12 साइकिल बरामद की है। पुलिस ने बताया कि भरत वाघरी साईकिल चुराकर भंगार माफिया मोहसिन यूनुस मलिक को बेच देता था। जिसके बाद मोहसिन साइकिल मॉडीफाय करके उन्हें महंगी दाम पर बेचता था।

### आरोपियों ने कबूले जूर्म

आरोपी सलाहुद्दीन सलीम खान ने अलकापुरी, गालानगर और नालासोपारा क्षेत्र से मोटरसाईकिल व पुराने कबाड़ वाहनों की चोरी कर कबाड़ के रूप में बेचने की जानकारी दी और दोनों आरोपियों ने कबूल किया कि उन्होंने 25 जनवरी को रात 2 बजे से 3 बजे के बीच क्रिस्टराज हाई स्कूल के पास से काले रंग की मोटर साईकिल संख्या एमएच 01एजे 8801 चोरी करने की साजिश रची थी। टेंपो से भरकर जीशान स्क्रैप स्थित बेचने की भी बात स्वीकार की है। पुलिस ने बताया कि सलाउद्दीन सलीम खान (22), व्यवसाय - भंगार विक्री, बिपीन दिलीप राय (27) व्यवसाय - रिक्षा चालक, जिशान अहमद इब्रार खान (27), व्यवसाय - भंगार खरेदी, विक्री और अविनाश नानकचंद वाल्मिकी (30) व्यवसाय ड्रा चालक है। इन सभी से गहनता से पूछताछ की तो उनके पास से एक लाख 40 हजार रुपये का कीमती सामान जब्त और कंपनी की साइकिल चोरी करने वाले शातिर अपराधी भरत चमन वाघरी व मोहसीन यूनुस मलीक को गिरफ्तार किया गया। इस तरह पुलिस ने छह मामलों का खुलासा करते हुए लगभग तीन लाख का माल बरामद किया है।

Scanned with CamScanner

लोकमत

लोकमत इन्फोग्राफिक्स

# तत्काळ मदत हवीय? डायल करा ११२!




मंगेश कराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** चोरी, घरफोडी, खून, बलात्कार, अपघात, हाणामारी, लूटमार अथवा कोणताही गुन्हा घडला की सर्वप्रथम पीडितेला पोलिसांची आठवण येते. पोलिस मदतीला पोहोचतातही. मात्र, घटनास्थळ शोधण्यात त्यांचा बराच वेळ जातो. हे लक्षात घेऊन राज्य शासनाने अडचणीतील व्यक्तीच्या मदतीसाठी पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहोचण्यासाठी ११२ ही सुविधा अत्याधुनिक यंत्रणेसह नागरिकांच्या मदतीसाठी सुरु केली आहे.

## काय आहे डायल ११२?

११२ हा नंबर डायल केल्यानंतर मीरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयांतर्गत अवघ्या दहा ते पंधराव्या मिनिटाला पोलिस घटनास्थळी हजर राहतील, असे नियोजन करण्यात आले आहे.

### ७० पेक्षा जास्त कॉल दररोज

पोलिसांकडे मदत मागण्यासाठी दिवसाला ७० पेक्षा जास्त कॉल येतात. ही मदत घरगुती भांडण, अपघात, मारामारी, दारु पिऊन रस्त्यावर धिंगाणा यासाठी येत असतात.

### ९० टक्के कॉल झाले पूर्ण

- हेल्पलाईन क्रमांक ११२ वर संपर्क साधल्यानंतर त्यांच्या मदतीला पोलिस धावून जातात.
- सुमारे ९० टक्के तक्रारदारांच्या समस्या सोडविण्यात पोलिसांना यश आले आहे.

## ४८ वाहने २४ तास कार्यरत

२८ चारचाकी, २० दुचाकी वाहनांची नेमणूक पोलिस आयुक्तालयात केली आहे. जर मदतीसाठी कॉल आला तर ज्या परिसरात ही वाहने गस्तीवर आहेत, त्यांना एमडीसीच्या माध्यमातून मॅसेज फॉरवर्ड केला जातो.

### ३० कर्मचाऱ्यांचा ताफा दिमतीला

पोलिस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षात ६ अधिकारी, २४ कर्मचारी २४ तास ऑन ड्यूटी असतात. त्याद्वारे नागरिकांना मदत केली जाते.

### सर्वाधिक तक्रारी महिलांच्या

पोलिस आयुक्तालयात सर्वाधिक कॉल महिलांचे येत असतात. दररोजच्या कॉलमध्ये महिलांच्या तक्रारींचे प्रमाण जास्त आहे.

### १० मिनिटांत मदत मिळते अडचणीत असलेल्यांना




- पती मारहाण करीत आहे, शेजारी भांडण करीत आहेत. छेडछाड केली जात आहे. कामाच्या ठिकाणी त्रास दिला जात आहे.
- अशा एक ना अनेक तक्रारी महिलांच्या नियंत्रण कक्षाला फोन करून सांगितल्या जातात. अशा अडचणीत असलेल्यांना १० ते १५ मिनिटांत मदत मिळत असते.

> नागरिकांना आता ११२ क्रमांकावर डायल करून मदत मागता येईल. त्यामुळे नागरिकांच्या मदतीला त्वरित धावून जाता येईल. तसेच स्थानिक पोलिसांना वायरलेस आणि फोनद्वारे मदतीसाठी कॉल आल्यावर माहिती दिली जाते.
>
> \- पोलिस प्रशासन



Scanned with CamScanner

लोकमत

# फरार पतीला अखेर पोलिसांनी केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये राहणाऱ्या पत्नीची हत्या करणाऱ्या फरार आरोपी पतीला अखेर विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी रविवारी दुपारी भिवंडी तालुका येथून अटक केली आहे. पतीने पत्नीची हत्या नेमकी का आणि कोणत्या कारणांमुळे केली याचा पोलिस तपास करत आहेत.

जीवदानी अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या प्रियंका ऊर्फ पिंकी पाटील (२५) हिचा मृतदेह १ फेब्रुवारीला राहत्या घरात मिळाला होता. जे. जे. रुग्णालयातील शवविच्छेदन अहवालावरून विरार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता. आरोपी पती वैभव पाटील (२७) याने त्याच्या व्हॉटस्ॲपच्या स्टेट्सवर आई-वडील मला माफ करा, मी काही वेगळे काम करणार आहे, असा मेसेज ठेवला होता. तसेच तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याने दोघांमध्ये नेहमी भांडणे व्हायची. पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला तेव्हापासून तो फरार होता, तर त्याच्या साथीदाराला अटक झाली होती.

आरोपी पतीला भिवंडी तालुका येथून रविवारी दुपारी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी पकडले आहे. त्याला सोमवारी वसई न्यायालयात हजर करणार आहे. याआधी त्याचा साथीदार संकेत राऊत या आरोपीला अटक केली होती.

**- राजेंद्र कांबळे,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक, विरार पोलिस ठाणे

Hello Vasai
Page No. 1 Feb 06, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत



विरार पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेमुळे महिलेची हरवलेली बॅग परत मिळाली असून या महिलेने पोलिसांचे आभार मानले आहेत.

# पोलिसांची कर्तव्यदक्षता; महिलेची बॅग मिळाली परत

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार पोलिस चौकी येथे साक्षी संदीप सिंग या महिलेची बॅग हरविल्याबाबत तक्रार आली होती. पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेमुळे महिलेची बॅग परत मिळाली आहे. यामुळे या महिलेने पोलिसांचे आभार मानले आहेत.

तक्रार मिळताच पोलिसांनी विरार रिक्षा स्टॅण्ड येथे जाऊन चौकशी केली असता रिक्षा क्रमांक एमएस ४८ एन ४११८ या रिक्षामध्ये त्यांची बॅग विसरल्याचे पोलिसांना कळले. तेव्हा पोलिसांनी तात्काळ या रिक्षाचालकाच्या मोबाइल नंबरवर संपर्क करून त्यास पोलिस चौकी येथे येण्यासाठी सांगितले. रिक्षाचालक पोलिस चौकीत आला तेव्हा या बॅगमध्ये साक्षी यांचा लॅपटॉप व एक तोळ्याचे मंगळसूत्र मिळून आले. या महिलेस लॅपटॉप व दागिने परत करण्यात आले.



Scanned with CamScanner

सकाळ

## वसई-विरार, मिरा-भाईंदर शहरात गुन्ह्यांत दुपटीने वाढ

# सायबर गुन्हेगारांचा फास घट्ट

प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा

वसई, ता. ५ : आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात चोरटेही आता हायटेक झाले आहेत. या हायटेक म्हणजेच सायबर गुन्हेगारांचे प्रमाण वसई-विरार, मिरा-भाईंदर पोलिस आयुक्तालय परिसरात वाढत असल्याचे पोलिसांनी दिलेल्या आकडेवारीवरून समोर आले आहे. २०२१ मध्ये ९९४ इतक्या सायबर गुन्ह्यांची नोंद झाली होती. यात गेल्या वर्षभरात जवळपास १७४४ म्हणजेच जवळपास दुपटीने वाढून दोन हजार ७३८ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यामुळे वसई-विरारसह मिरा-भाईंदर शहराला सायबर गुन्ह्यांचा विळखा पडला आहे.

फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटसअॅपसह मोबाईल क्रमांकावर सायबर गुन्हेगार विविध प्रकारचे संदेश पाठवून नागरिकांना फसवून त्यांच्या खात्यातून रक्कम लंपास करतात. यासाठी आता ओटीपीपेक्षा यूपीआय पिनचा वापर अधिक होत असल्याचे तपासातून समोर आले आहे. पोलिस आयुक्तालय क्षेत्रात असे प्रकार वाढू लागले असून नागरिकांनो सावधान राहा व त्वरित तक्रार नोंद करा, असे आवाहन सायबर गुन्हे कक्षाकडून करण्यात येत आहे.

पोलिस आयुक्तालय अंतर्गत सायबरविषयक तक्रारींची चौकशी व सायबर गुन्ह्यांच्या तपासाकरीता गुन्हे शाखा अंतर्गत सायबर गुन्हे कक्ष कार्यरत आहे. ऑनलाईन फसवणुकीची तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांकडून त्वरित तपास करत सायबर भामट्यांच्या मुसक्या आवळल्या जातात. सायबर गुन्हे कक्ष येथे सामान्य नागरिकांची ऑनलाईन फसवणुकीची तक्रार प्राप्त होताच तात्काळ ज्या बँक खात्यात किंवा वॉलेटमध्ये रक्कम जमा झाली आहे, त्याचा शोध घेऊन सायबर गुन्हे कक्षाचे पोलिस अधिकारी, पोलिस अंमलदार या रकमेबाबत संबंधित बँकेशी संपर्क साधून ती रक्कम तक्रारदाराला परत मिळवून देत आहेत. पोलिस आयुक्तालयात पोलिस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर गुन्हे कक्षाचे पोलिस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्नील चाव्हळ, उपनिरीक्षक प्रसाद शेनोळकर, हवालदार माधुरी धिंडे, प्रवीण आव्हाड, अंमलदार गणेश इलग, पल्लवी निकम, सुवर्णा माळी, अमिना पठाण आदींनी सायबर गुन्हे उघडकीस आणण्यासाठी यश मिळवले आहे.

> सायबर गुन्ह्यांबाबत जनजागृती केली जात आहे. पोलिसांना अशा प्रकरणाचा तपास करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नागरिकांनी सावधपणे केला पाहिजे. यूपीआयचा पिन हा शेयर करू नका, तसेच अनोळखी व्यक्तीला आपली वैयक्तिक माहिती देणे टाळा.
> **- सुजितकुमार गुंजकर,** पोलिस निरीक्षक, सायबर गुन्हे कक्ष

### हनी ट्रॅपपासून सावधान

समाजमाध्यमांवरून होणारी ओळख अनेकदा महागात पडते. यात अनोळखी व्यक्ती व्हिडीओ कॉल करून आक्षेपार्ह गोष्टींचे चित्रिकरण केले जाते. त्यानंतर त्याच्या मदतीने ब्लॅकमेलिंग करून पैसे उकळण्याचा प्रयत्न होतो. आपली समाजात बदनामी होईल या भीतीने काही जण या जाळ्यात अडकतात, त्यामुळे अनोळखी मुलींशी समाजमाध्यमांवर काही क्षणाकरिता केलेली मैत्री पश्चातापाची वेळ आणू शकते. त्यामुळे अशा गोष्टींपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



### जनजागृतीसाठी सेल्फी स्टँड



सायबर गुन्हे कक्षाकडून आयुक्तालयातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांना सायबर तपासाबाबत २२ ठिकाणी प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे. तसेच सायबर गुन्हे फसवणुकीच्या प्रकारांबाबत माहिती देण्याकरीता १२ विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायबर गुन्हे कक्षाकडून सायबर तक्रारीमध्ये होणाऱ्या नागरिकांच्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी व सायबर फसवणुकीबाबत जनजागृती निर्माण होण्याकरीता स्वतंत्र सेल्फी स्टँडची उभारणी करण्यात आली आहे.




### फसवणूक झाल्यास काय कराल?

तात्काळ नजीकच्या पोलिस ठाणे, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर तक्रार द्यावी, असे आवाहन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाने नागरिकांना केले आहे.

**येथे करा तक्रार**

१ मोबाईल हरविल्यास किंवा चोरीला गेल्यास https://www.ceir.gov.in/home/in/index.jsp

२ बँक/विमा कंपनी यांच्याविषयी तक्रार - https://sachet.rbi.org.in/

३ हरवलेले, गहाळ झालेले कागदपत्र, वस्तू तक्रारीसाठी- https://www.mbvv.mahapolice.gov.in/

४ फसवे एसएमएस, ई-मेल्स, कॉल - https://www.reportphishing.in/

### परदेशी ओळख महागात

समाजमाध्यमांवर अनेकदा परदेशी नागरिक म्हणून ओळख केली जाते, एकमेकांना मोबाईल क्रमांक दिला जातो. त्यानंतर भेटण्यास एअरपोर्टवर आलो, मात्र कस्टम किंवा अन्य बहाणा सांगून पैशांची गरज आहे असे सांगून पाठवण्याची विनंती करून लाखो रुपयांचा गंडा घातला जातो.

Mumbai, Palghar-Today
06/02/2023 Page No. 1

Scanned with CamScanner

लोकमत

# एटीएम कार्डची अदलाबदली करून फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईत एकाची एटीए कार्डची अदलावदली करून फसवणूक करून जवळपास ८० हजार रुपयांच फसवणूक केल्याची घटना समो आली आहे.

वसईच्या खैरपाडा येथील दांडेक चाळीत राहणारे मनोज धावडे (४०) है ३१ ऑक्टोबरला सकाळी अकर वाजण्याच्या सुमारास वालीव नाक येथील युनियन बँकेच्या एटीएममध्ये आपला बँक बॅलन्स चेक करण्यासाठ गेले होते. मात्र, त्यांना एटीएम मशीनव बॅलन्स चेक करता येत नसल्याचे पाहू एका आरोपीने मदत करण्याच्य बहाण्याने एटीएम कार्डचा पासव पाहून कार्डची अदलावदली केली त्यानंतर त्यांच्या बँक खात्यातून ७ हजार २०८ रुपये काढून त्यांच फसवणूक केली. चार महिन्यानंत वालीव पोलिसांनी शनिवार फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

गेल्या काही दिवसांत वसई-विरार नालासोपारा परिसरात एटीएम का अदलावदली करून फसवणूक होण्याच्या घटना वाढल्या आहेत त्यामुळे एटीएममध्ये कोणत्याह अनोळखी व्यक्तिची मदत घेऊ नये पासवर्ड त्यांना सांगू किंवा दाखवू नये कोणापासूनही सावध राहावे अर आवाहन पोलिसांनी केले आहे.



Scanned with CamScanner